प्रशासकीय मान्यता

सन २०१९-२०या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत प्राप्त अनुदानातून यंत्र खरेदीस प्रशासकीय मान्यता.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : जीएमए-२०१९/प्र.क्र.२३८/प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : १३ सप्टेंबर २०१९

वाचा :

१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८.

४) जिल्हा नियोजन अधिकारी अकोला, यांचे पत्र क्रमांक जिनिस / सस -२ /जिवायो १९-२० /नियतव्यय / ४९४/ २०१९, दिनांक, १६.०४.२०१९

५) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/शावैमअकोला /जिवायो/यंसाख / प्र.मा./ म / १२३५१ /२०१९, दिनांक २९.०८.२०१९

शासन निर्णय :-

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला या संस्थेस उपरोक्त दिनांक १६.०४.२०१९ च्या पत्रान्वये सन २०१९-२० या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर करण्यात आलेल्या निधीतून खालील तक्तयात नमूद केलेली रुपये २,४९,८९,६१५/- (रु.दोन कोटी एकोणपन्नास लक्ष एकोणनव्वद हजार सहाशे पंधरा फक्त) इतक्या रकमेची यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासननिर्णयान्वये पुढील अटीच्या राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ .क्र.	यंत्राचे नांव	नग	प्रतिनग किंमत (रुपये)	एकुण किंमत (रुपये)
१	ॲटोमेटेड लिक्वीड बेस्ड सायटोलॅजी सिस्टीम	१	९४९७८२०	९४९७८२०
२	ओटी लाईट विथ एल.ई.डी. विथ	१	२५०००००	२५०००००

अ .क्र.	यंत्राचे नांव	नग	प्रतिनग किंमत (रुपये)	एकुण किंमत (रुपये)
	इनबिल्ड कॅमेरा रीले सिस्टीम विथ ३ वे कम्युनिकेशन			
३	अल्ट्रासॉनिक कटींग अँड कोयाग्युलशन डिव्हाईस विथ ॲडव्हान्स आर एफ एनर्जी (हारमोनीक स्पॅनल)	१	२३४६६२१	२३४६६२१
४	नॉनमेडीयाटीक रेटीनल कॅमेरा	१	२३४००००	२३४००००
५	ॲडव्हान्स लॅबोटरी बायनाक्युलर मायक्रोस्कोप (बाय बॅक)	५६	४१०६४	२२९९५८४
६	पेडीयाट्रीक व्हेंटीलेटर	१	१४०००००	१४०००००
७	मोनोकुलर टीचींग मायक्रोस्कोप (बाय बॅक)	५५	२०६५०	११३५७५०
८	स्लिट लॅम्प	१	११७५०००	११७५०००
९	बॅटरी ऑपरेटेड राईड ऑन स्क्रबर ड्रायर	१	१०७५०००	१०७५०००
१०	ॲटोरेफरेक्टो केराटोमीटर	२	४३५०००	८७००००
११	सोलर डिपफ्रीजर	१	३४३८४०	३४९८४०
	एकूण			२,४९,८९,६१५

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता संबधित संस्थेस जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर अनुदानातून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची, बांधकामाची व विद्युतीकरणाची आवश्यकता नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा करावी.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०.उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे खरेदी समितीने अनुपालन करावे. सदर तरतूदीचे अनुपालन केलेल्या यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी येणारा खर्च संस्थेस खालील लेखाशिर्षाखालील मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

		मागणी क्रमांक एस -४
०३	-	वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षण व संशोधन
१०५	-	विषमचिकित्सा
६२	-	जिल्हा योजना अकोला
(६२) (०१)	-	रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री व साधन सामुग्री खरेदी
५२	-	यंत्रसामुग्री व साधनसामुग्री
		(४२१० १५८५)

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११२१०३०५३२१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN
MURLIDHAR
RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b22
44d66593f50dd713da83860912503,
postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI,
serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63
f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN
MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.09.13 14:46:17 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी , जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला
६. जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला.
७. निवडनस्ती (प्रशा-१).